# वसई-विरार शहर महानगरपालिका
## आपत्ती व्यवस्थापन विभाग

दि.०७/०६/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात पावसाळयात भूस्खलन होणाऱ्या ठिकाणी दरडी कोसळून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपाययोजना म्हणून सदरील ठिकाणी महानगरपालिकेमार्फत ‘सूचना फलक’ लावण्यात आले आहेत. भूस्खलन होणाऱ्या ठिकाणी पावसाळयात नागरिकांनी जाऊ नये किंवा पावसाळयात सदर ठिकाणी वास्तव्य करू नये असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. अशा ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या कुटुंबांना पावसाळयात महानगरपालिकेतर्फे तात्पुरत्या निवारा केंद्राची सोय प्रभाग समिती निहाय करण्यात आलेली आहे.

भूस्खलन होण्याची शक्यता असलेली ठिकाणे ही वनविभागाच्या हद्दीत येत आहेत. वन विभागाच्या हद्दीत असलेल्या खालील नमूद ठिकाणी लोकवस्ती असल्यामुळे सदर ठिकाणी भूस्खलनामुळे दरडी कोसळून जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता आहे. सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण झाल्याचेही निदर्शनास आले आहे. वन विभागामार्फत सदरील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निष्कासीत करणे व सदर ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये उचित कारवाई करणे बाबतचे पत्र महानगरपालिकेमार्फत वनविभागास देण्यात आले असून पत्रासोबत त्याठिकाणी झालेल्या अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण यांचे जी ओ टॅगिंग फोटोही वनविभागास पाठविण्यात आले आहेत.

**<u>भूस्खलनाची (दरड कोसळणे) ठिकाणे :</u>**

संतोष भुवन, शिर्डी नगर, काजू पाडा, पाचआंबा, आचोळे डोंगरी, पडखळ पाडा, निळेगांव डोंगर परिसर, मोरेगांव डोंगर परिसर, तुंगारेश्वर, चिंचोटी.

आपत्ती व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका